महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(AGovt. of Maharashtra Undertaking)
CIN:U४०१०९MH२००५SGC१५३६४५

दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
फॅक्स नं. : २६४७५८१४
Email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग,
प्लॉट जी-९, प्रकाशगड, ४था मजला
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

जा.क्र. : औसंवि/ब/विमा योजना/१३०३८ दिनांक : ०७.०५.२०१६

# परिपत्रक

**विषय :** केंद्र/राज्य शासनाच्या विमा योजना कर्मचाऱ्यांना अवगत करण्याबाबत.

******

म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित तसेच महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपन्यांतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या ०५ सदस्यांसाठी रु.०३ लाख मर्यादेची वैद्यकीय विमा योजना दि. ०१ जानेवारी २०१६ ते दि. ३१ डिसेंबर २०१६ या कालावधी करिता सुरु करण्यात आलेली आहे. तसेच वैयक्तिक अपघात गट विमा योजना फक्त कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी रु.०२ लाखांपर्यत उपलब्ध करण्यात आलेली आहे.

औद्योगिक संबंध विभागाची बैठक दि. ०२.०१.२०१६ रोजी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीस संचालक, महावितरण यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. सदर बैठकीत मा. अध्यक्ष यांनी उपरोक्त योजनांव्यतिरिक्त केंद्र व राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती प्राप्त करुन वीज कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना व त्यांच्या अवलंबितांना लाभ मिळावा या दृष्टीने सर्व कर्मचाऱ्यांपर्यंत परिपत्रकाद्वारे माहिती प्रसारीत करण्याबाबत निर्देशीत केले होते.

त्यानुषंगाने, केंद्र व राज्य शासनाच्या विमा योजनांचा तपशील व वैशिष्ठये खालील प्रमाणे आहेत.

## १. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना

- सदर योजनेत सहभागी होण्यासाठी बँकेमध्ये बचत खाते असावयास हवे व अर्जदाराचे वय १८ ते ७० वर्षपर्यंत असावे.
- अर्जदाराचे एकापेक्षा जास्त बँकेमध्ये बचत खाते असल्यास कुठल्याही एकाच खात्यावरुन सदर योजनेत सहभागी होता येईल.
- याकरिता अर्जदारास संमती पत्र व त्यासोबत के. वाय. सी. म्हणून आधारकार्ड बँकेकडे सादर करावे लागेल.
- सदर विमा योजनेचा कालावधी एक वर्षाच्या (०१ जून ते ३१ मे) कालावधीचा आहे.
- प्रधान मंत्रीसुरक्षा विमा योजनेची रक्कम रु. २ लाख इतकी आहे.
- याकरिता, अर्जदाराच्या बचत खात्यावरुन वार्षिक रु. १२/- इतका विमा हप्ता परस्पर जमा केला जाईल.
- अर्जदारास अपघात झाल्यास या विमा योजने अंतर्गत कर्मचाऱ्याला खालीलप्रमाणे नुकसान भरपाई देय राहील.

अ) कर्मचाऱ्यास / अर्जदारास मृत्यु झाल्यास - १०० टक्के
ब) कायमचे अपंगत्व आल्यास - १०० टक्के
क) दोन हात / दोन्ही डोळे / एक हात व एक डोळा गमावल्यास - १०० टक्के
ड) एक हात / एक डोळा गमावल्यास - ५० टक्के

**अर्जदारास प्राणांतिक अपघात झाल्यास त्यांच्या वारसाकडून दावा दाखल करण्यासाठी खालील कागदपत्रे बँकेकडे सादर करावी व संबंधीत बँकेमार्फत ती विमा कंपनीस पाठवण्यात येईल.**

**(मृत्यु दावा दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे ) :**

१. दावा दाखल करण्यासाठी भरावयाचा विहीत नमुना अर्ज.
२. मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत.
३. मृत्यु होण्यापूर्वी ज्या दवाखान्यात किंवा ज्या वैद्यकीय तज्ञांकडे उपचार घेण्यात आले त्याचा वैद्यकीय अहवाल.
४. शवविच्छेदन अहवाल (सांक्षाकीत प्रत)
५. तपासणी अहवाल. (सांक्षाकीत प्रत)
६. अपघात अहवाल.
७. प्रथम खबर अहवाल, पोलीस पंचनामा / एम. एल. सी. (सांक्षाकीत प्रत)
८. रासायनिक प्रक्रिया अहवाल.(उपलब्ध असल्यास) आंतरांग तपासणी अहवाल (उपलब्ध असल्यास)
९. दवाखान्यातील उपलब्ध माहिती.
१०. कार्यालयीन हजेरीपटाची प्रत / हजेरीपट.
११. वर्तमान पत्रातील कात्रणे अथवा उपलब्ध असलेली इतर कागदपत्रे.
१२. वार्षिक उत्पन्न दर्शविणारा अद्यावत उत्पन्न कर दाखला. (I.T. Return)
१३. अनुक्रमण आदेश /कायदेशीर वारस प्रमाणपत्र / सदर विमा योजने अंतर्गत नामनिर्देशन केले नसल्यास , कायदेशीर वारस सिध्द करण्या योग्य कोणतीही कायदेशीर कागदपत्रे.
१४. विमा कंपनीला आवश्यक वाटणारी इतर कागदपत्रे.

## २. प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना

- सदर योजनेत सहभागी होण्यासाठी बँकेमध्ये बचत खाते असावयास हवे व अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षपर्यंत असावे.
- अर्जदाराचे एकापेक्षा जास्त बँकेमध्ये बचत खाते असल्यास कुठल्याही एकाच खात्यावरुन सदर योजनेत सहभागी होता येईल.
- याकरिता अर्जदारास संमती पत्र व त्यासोबत के. वाय. सी. म्हणून आधारकार्ड बँकेकडे सादर करावे लागेल.
- सदर विमा योजनेचा कालावधी ०१ वर्षाच्या (०१ जून ते ३१ मे) कालावधीचा राहील.
- प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेची रक्कम रु. २ लाख इतकी आहे.
- याकरिता, अर्जदाराच्या बचत खात्यावरुन वार्षिक रु. ३३०/- प्रत्येकी इतका विमा हप्ता एक रक्कमी परस्पर जमा केला जाईल. (Auto Debit Facility)
- अर्जदारास कोणत्याही कारणास्तव मृत्यु आल्यास त्यास रु. २ लाख इतकी रक्कम देय आहे.
- अर्जदाराने सदर योजनेत सहभागी होण्याकरिता नोंदणी करतेवेळी स्वत:स चांगले आरोग्य असुन कोणताही गंभीर आजार नसल्याचे प्रमाणपत्र संबंधित बँकेस सादर करावे. (Consent cum Declaration Form).

- अर्जदाराने दि. ३० मे पूर्वी असे प्रमाणपत्र व संमतीपत्र संबंधीत बँकेकडे दिल्यानंतरच वार्षिक रु. ३३०/- इतकी विमा हप्ताची रक्कम परस्पर (Auto Debit) बचत खात्यातून बॅकेंद्वारे वळती करण्यात येईल.
- दि. ०१ जून ते ३१ मे या कालावधीत केव्हाही अर्जदार या योजनेत सहभागी होऊ शकतो मात्र त्यास वार्षिक विमा हप्ता हा रु. ३३०/- भरावा लागेल व लाभ दि. ०१ जून ते ३१ मे या कालावधीपुरताच मिळेल.
- सदर योजना ०१ वर्षाची असून दरवर्षी त्याचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे.
- सदर योजनेच्या काळात म्हणजेच फक्त वयाच्या १८ ते ५० वर्षापर्यत अर्जदारास कुठल्याही कारणाने अथवा नैसर्गिक मृत्यु आल्यास या योजनेतंर्गत वारसास विमा रक्कम रु. ०२ लाख मिळतील.
- सदर योजनेत सहभागी होताना अर्जदाराने वारसाची नोंद करणे आवश्यक आहे.
- सदर योजना जीवन विमा निगम (LIC) मार्फत केंद्र शासनाने सुरु केली असून या योजनेच्या अटी व शर्तीनुसार बँकेना विमा कंपनी निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

उपरोक्त योजना फक्त बँक खाते धारक असणाऱ्या व्यक्तींना पात्र असून त्यांनी त्यांच्या बँक खात्यामार्फतच विमा हप्ता कपात करण्याचे निर्देश संबंधित बँकेस दिल्यानंतरच बँकेद्वारे विमा योजनेची कार्यवाही करण्यात येते. बँकेमार्फत एकत्रितपणे वार्षिक रक्कम धनादेशाद्वारे किंवा रोख स्विकारण्यात येत नाही. सबब, प्रत्येक कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या अवलंबितांनी वैयक्तिकपणे त्यांच्या बँकेस अर्ज सादर करुन विमा हप्ता कपात करण्याची संमती देवून उपरोक्त योजनांचा लाभ घ्यावा. तसेच नियमानुसार अर्जदारास एकापेक्षा जास्त बँकेमध्ये बचत खाते असल्यास कुठल्याही एकाच खात्यावरुन सदर योजनेत सहभागी होता येईल.

सदर योजनांसाठी महावितरणचा कोणत्याही स्वरुपाचा सहभाग असणार नाही व केवळ चांगल्या योजनांची माहिती कर्मचाऱ्यांमध्ये प्रसारीत व्हावी या दृष्टीने परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

7.5.2016

(नीलेश गटणे)
कार्यकारी संचालक (मासं)

प्रत : प्रेषण यादी प्रमाणे क्षेत्रीय कार्यालयातील कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.